**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
**मी प्रतिज्ञा पूर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नाव | – सय्यद अब्बास हुसेन पि. सय्यद अहेमद हुसेन, |
| वय | – ५६ वर्ष |
| धंदा | – वकीली, |
| राहणार | – पूर्णा ता. पूर्णा व जि. परभणी. |

**वादीचा उलटतपास प्रतिवादी क्र. २ ते ७ व ११ चे विधीज्ञ श्री. एस. एस. काळे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

१. माझे वडील दिनांक १६.११.२०१७ रोजी मयत झाले.

प्रश्न – तुमच्या बहिणीस प्रस्तुत दाव्यामध्ये वादी म्हणून समाविष्ट केलेले नाही ?

उत्तर – गरज नाही.

२. दावा मिळकतीचा मी मालक असल्याची बाब कोणत्याही दिवाणी न्यायालयाने घोषीत केलेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर घोषणा महसूल न्यायालयाने केले आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये पूर्वी मी माझ्या वडीलांतर्फे मुखत्यारपत्र दाखल केलेले होते.

प्रश्न – त्या मुख्यात्यापत्रामध्ये प्रस्तुत दाव्यातील दावा मिळक्तीचा उल्लेख केलेला नाही ?

उत्तर – सदर मुखत्यारपत्र सदर दाव्या संदर्भात दाखल केलेले होते.

३. दावा मिळकत माझ्या कुटुंबीयाच्या ताब्यात सन १९३० सालापासून आहे. दावा मिळकती सदर्भात भरलेल्या करा संदर्भातील पावत्या मी अभिलेखावर दाखल केलेल्या नाहीत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो सदर पावत्या अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः शेतकरी नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या मुळ मालकाचे नाव भिमजी अमृत कदम होते. भिमजी अमृत कदम यांच्या मुलाचे नाव देवराव भिमजी कदम होते किंवा कसे याबाबत मला काहीही माहिती नाही.

प्रश्न – प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ गंगाबाई देवराव कदम ही देवराव

भिमजी कदम यांची एकुलती एक मुलगी होती ?

उत्तर – या नावाची कोणतीही स्त्री अस्तित्वात नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्रमांक १४९ मधील ८ हे. २६ आर ही मिळकत गंगाबाई देवराव कदम यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, सय्यद एकबाल हुसेन व आयशा बेगम हे दोघेही एम.एल.ए होते. एकबाल हुसेन यांचे निधन १९९१ साली झाले. आयशा बेगम यांचे निधन १९८२ साली झाले. हे म्हणणे खरे नाही की, एकबाल हुसेन व आयशा बेगम हे आमदार असल्याच्या बाबीचा गैरफायदा घेवून मी दावा मिळकत खोटे दस्ताऐवज तयार करुन महसूल कार्यालयात नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची मुळ मालकी दर्शविणारा एकही दस्ताऐवज मी प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गंगाबाई व्यतिरिक्त प्रतिवादी क्र. २ ते ११ यांच्याविरुध्द मी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद तथा इतर महसुली न्यायालयायामध्ये कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही.

प्रश्न — गंगाबाई देवराव कदम यांच्या नावे फेरफार क्र. ३१५५ मंजूर झाला व त्यांचे नाव महसूली दस्ताऐवजावर मालकी हक्कामध्ये दर्शविण्यात आले ?

उत्तर – खोटा फेरफार करण्यात आलेला होता, साक्षीदार पुन्हा सांगतो की सदरचा फेरफार रद्द करण्यात आलेला आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, सदर फेरफाराविरुध्द महसूल मंत्रालयामध्ये अपील प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ गंगाबाई देवराव कदम दावा मिळकतीची कायदेशीर मालक झाल्यानंतर त्यांनी सन २०१० मध्ये खरेदी क्र. ११८०/२०१० ने सदर मिळकत प्रतिवादी क्र. २ ते ११ यांना विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळे पासून प्रतिवादी क्र. २ ते ११ हे प्रस्तुत मिळकतीचे कायदेशीर मालक असून मिळकतीचा कब्जा त्यांच्याकडे आहे.

प्रश्न – तुम्ही आजपर्यंत खरेदी खत क्र ११८०/२०१० कोणत्याही न्यायालयातून रद्दबातल करुन मागितलेले नाही

उत्तर – त्याची गरज नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत खरेदी खत ११८०/२०१० खोटे व बनावटी आहे यासंदर्भात कोणतीही फौजदारी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,

खरेदी खताच्या दिवशी माझी दावा मिळकतीवर मालकी तसेच कब्जा नव्हता. मी सदरचे खरेदी खत नोंदवू नये या कारणासाठी दुय्यम निबंधक कार्यालय पूर्णा येथे आक्षेप नोंदवणारा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाची प्रत मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदरचे खरेदी खत क्र. ११८०/२०१० आज देखील कायम आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ते ११ हे दावा मिकतीचे बोनाफाईड पर्चेसर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या अनुषंगाने टेनन्सी संदर्भात प्रकरण मी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी दावा मिळकतीवर कोणतीही मालकी तथा ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी उपरोक्त नमूद खरेदी खताचा गैरवापर करुन मला दावा मिळकतील कब्जा खाली करण्या संदर्भात धमकी दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी मा. न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाची पायमल्ली केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्याच्या अनुषंगाने योग्य मुल्यांकन भरलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा नमूद केला आहे व आजरोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण ...**

**फेरतपास काही नाही...**

**प्रतिवादी क्र. १ व ८ मयत परंतु पुर्ततेअभावी दावा त्यांच्याविरुध्द अबेट.**

प्रतिवादी क्र. ९ व १० यांच्या विधीज्ञांच्या निशाणी क्र. २९७ वरील अर्जाच्या आदेशान्वये प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–
(एस. एस. साळुंखे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
पूर्णा जि. परभणी.

दिनांक – २२.०७.२०२६